# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 281/2022 दिनांकः 21.07.2022**

## 1)जबरी चोरी :—

**1)भाग्यनगर :—**दिनांक 20.07.2022 रोजी चे 05.45 वा. चे सुमारास, **वरद मेडीकल समोर नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्यांचे पती सकाळी फिरण्यासाठी गेले असतांना यातील अज्ञात दोन आरोपीतांनी संगणमत करून मो सा वर येवुन फिर्यादीचे गळयातील 17 ग्रॅमचे सोन्याचे गंठण किंमती 55,000/रूपयाचा ऐवज जबरीने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी विमलबाई काशिनाथ पाईकराव, वय 64 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. सारनाथनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 244/2022 कलम 392, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री कांबळे, मो. क्रं. 9823031227** हे करीत आहेत.

## 2)घरफोडी :—

**1)नांदेड ग्रामीण :—** दिनांक 19.07.2022 रोजी चे 20.00 ते दि. 20.07.2022 चे 08.00 वा. चे दरम्यान, **सत्यसाई ऑईल मिलचे बाजुस एमआयडीसी सार्थक ईंटरप्राइजेस कारखाना सिडको ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीने त्याच्या श्री सार्थक ईंटरप्राइजेस कारखान्याचे शटर बंध करून घरी गेला असता यातील अज्ञात आरोपीतांनी कारखान्याचे शटरचे लॉक तोडुन आत प्रवेश करून काउंटरमध्ये ठेवलेले नगदी 25,000/—रूपये चोरून नेले. वगैरे **फिर्यादी शुभम तुकाराम बरगळ, वय 27 वर्षे, व्यवसाय टाकी कारखाना रा. लातुरफाटा ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 414/2022 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1912 तिडके, मो.क्र. 9421394862** हे करीत आहेत.

**2)लोहा :—** दिनांक 20.07.2022 रोजी चे 11.00 ते 13.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहाते घरी वंजारवाडी ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात व संशयीत आरोपीतांनी फिर्यादीच्या घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप व घरातील इतर खोलीचे कुलूप तोडुन आत प्रवेश करून घरातील मधल्या खोलीतील ठेवलेले लोखंडी पेटीचे कुलूप तोडुन पेटीतील जनावरे विक्री केलेले व पीक विम्यातुन मिळालेले नगदी 1,00,000/—रूपये व चांदीच्या विटा व निजाम कालीन चांदीचे नाणे असा एकुण 1,40,500/—रूपयाचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरटयाने व संशयीत आरोपीतांनी चोरून नेले. वगैरे **फिर्यादी विठ्ठल म्हैपती गिते, वय 72 वर्षे, व्यवसाय शेती रा. वंजारवाडी ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 137/2022 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री शेख, मो. क्र. 9588607011** हे करीत आहेत.

## 3)गंभीर दुखापत :—

**मुखेड :—**दिनांक 20.07.2022 रोजी 06.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे राहाते घरी मौ. चांडोळा ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने फिर्यादीस तु भावाच्या शेताचे हित का करत आहेस असे म्हणुन शिवीगाळ करून फिर्यादीचे उजवे पायाचे गुडघ्यावर व उजव्या हाताचे दंडावर काठीने मारून फॅक्चर करून गंभीर दुःखापत केली. आणि तुला तर जिवंत मारून टाकतो म्हणुन जिवे मारण्याची धमकी दिली आहे. वगैरे **फिर्यादी गंडेराव नरसिंह श्रीरामे, वय 65 वर्षे, व्यवसाय शेती रा. चांडोळा ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरन 218/2022 कलम 326, 504, 506, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री जाधव, मो. नं. 9765860359** हे करीत आहेत.

## 4)विवाहीतेचा छळ :—

**1)अर्धापुर :—** माहे जानेवारी, 2021 ते माहे मे 2022 चे दरम्यान, **फिर्यादीचे सासरी मौ. समगा ता. जि. हिंगोली ह. मु. बारसगाव ता. अर्धापुर जि. नांदेड येथे**, यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तु रूम करण्यासाठी माहेरहुन दोन लाख रूपये घेवुन ये असे म्हणुन पैसे न दिल्याने तिस शिवीगाळ व मारहाण करून उपाशी पोटी ठेवुन शारिरीक व माणसीक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी** 24 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 207/2022 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/797 खरबे, मो.क्रं. 9421766039** हे करीत आहेत.

**2)शिवाजीनगर :–** दिनांक 26.06.2019 चे 00.00 ते 20.07.2022 चे 00.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे सासरी मौ. पेडु ता. पालम जि. परभणी ह. मु. जयभिमनगर. नांदेड येथे**, यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तु दिसायला चांगली नाहीस, तुला स्वयंपाक येत नाही तु मतीमंद आहेस, तु कोणत्या गोळया खातेस तुला बोलता येत नाही तु आम्हाला पंसद नाहीस म्हणुन फिर्यादीस तुझ्या बापाकडुन मो सा करीता पैसे घेवुन ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून उपाशी पोटी ठेवुन शारिरीक व माणसीक छळ केला. वगैरे **फिर्यादी** 21 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 277/2022 कलम 498(अ), 323, 504, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोहेकॉ/882 सुर्यवंशी, मो.क्रं. 9421870108** हे करीत आहेत.

**3)नांदेड ग्रामीण :–** माहे ऑक्टोबर, 2021 ते माहे जानेवारी 2022 चे दरम्यान, **फिर्यादीचे सासरी व माहेरी मिलगेट एरिया नजर मंजील नांदेड येथे**, यातील नमुद सात आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुझ्या माहेरहुन ॲपे ॲटो घेण्यासाठी दोन लाख रूपये घेवुन ये म्हणुन तिस शिवीगाळ व मारहाण करून उपाशी पोटी ठेवुन शारिरीक व माणसीक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी** 19 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 442/2022 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/शिंदे, मो.क्रं. 9511851737** हे करीत आहेत.

# 5)आत्महत्येस प्रवृत केले :–

**विमानतळ :–**दिनांक 16.07.2022 रोजी चे 08.30 वा. चे सुमारास, **संजिवनी हॉस्पीटल नांदेड येथे,** यातील **मयत नामे बालाजी मोहनराव जाधव, वय 42 वर्षे व्यवसाय मेडीकल रा. कोपर खैरने सेक्टर–6 ठोण ता. जि. ठाणे ह. मु. बजरंग कॉलनी नांदेड**, यास यातील नमुद सहा आरोपीतांनी संगणमत करुन राजकुमार इंगळे यास दिलेले पैसे मयताने द्यावे लागतील म्हणुन वारंवार माणसीक त्रास दिला मेडीकलच्या जागेबाबत कागदत्र बनवण्यासाठी वारंवार. त्रास देवुन आत्महत्या करणेस प्रवृत केले. यातील आरोपीतांचे त्रासाला कंटाळुन आत्महत्या केली आहे. यातील नमुद आरोपी हे कारणीभुत आहेत. वगैर **फिर्यादी सोनाली बालाजी जाधव, वय 35 वर्षे, व्यवसाय गृहीणी रा. कोपर खैरने सेक्टर–6 ठाणे ह. मु. बजरंग कॉलनी नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 252/2022 कलम 306, 504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री अनलदास, मो.नं. 7020201376** हे करीत आहेत.

# 6)खंडणी :–

**नांदेड ग्रामीण** :–दिनांक 05.10.2016 ते माहे सप्टेंबर 2021 पर्यंत, **नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील मौ. आसरजन ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी फिर्यादी व साक्षीदारां विरूध्द सामुहीक कट रचुन बनावट सौदा चिठ्ठी तयार करून फिर्यादीच्या खोटया सहया करून पोलीसांत खोटी तक्रार देवुन फिर्यादीच्या जमीन विकासाच्या कामात अडथळा आणुन धमकी देवुन फसवणुक करून ब्लॅक मेल करून माहे सप्टेंबर 2021 पर्यंत फिर्यादीकडुन एक कोटी वीस लाख रूपये खंडणी स्वरूपात वसुल केली आहे. वगैरे **फिर्यादी शिरीष बाबुलाल कासलीवाल, वय 55 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. रिदीशा बिल्डींग विसावानगर ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 243/2022 कलम 120(ब), 384, 385, 420, 465, 467, 468, 471, 474, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री आरसेवार आर्थीक गुन्हे शाखा, मो.क्रं. 9766633143** हे करीत आहेत.

# 7)जुगार :–

**1)लोहा :–** दिनांक 20.07.2022 रोजी 15.05 वा. चे सुमारास, **भाजी मंडई ते इंदिरानगर जाणारे रोडवर चंद्रकांत कळकेकर यांचे घरासमोर रोडवर ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या स्वतःच्या फायदया करीता कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना 1760/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/408, अशोक माधवराव केंद्रे, ने. पोस्टे लोहा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 136/2022 कलम 12(अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोहेकॉ/1754 सुर्यवंशी मो.क्र. 9673649210** हे करीत आहेत.

## 8)प्रोव्हिबीशन :—

**1)मुखेड :—** दिनांक 20.07.2022 रोजी 16.30 वा. चे सुमारास, **मौ. पाळा ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारु भिंगरी संत्रा किंमती 2440/—रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री भारत रमेश जाधव, ने. पोस्टे मुखेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 219/2022 कलम 65 (ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1631 पांडे, मो.क्र. 7588068256** हे करीत आहेत.

**2)धर्माबाद :—** दिनांक 20.07.2022 रोजी 18.15 वा. चे सुमारास, **मौ. येवती शिवारातील हायवे रोड लगत उत्तर बाजुस दत्ता गंजेवार यांचे शेतात टीन प़त्राचे आडोशाला मौ. येवती शिवार ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारु भिंगरी संत्रा किंमती 1470/—रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री माधव मष्णाजी वाडेकर, ने. पोस्टे धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 170/2022 कलम 65 (ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2022 मठपती, मो.क्र. 8390589720** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड